# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in


जा. क्र. मनपा/सा.प्र./३६८/२०२६-२७ दि. /०९/२०२६

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी**
**जनसंपर्क विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :-** २८ सप्टेंबर हा दिवस "**माहिती अधिकार दिन**" म्हणून करणेबाबत.

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. केमाअ २००८/प्र.क्र.३७८/०८/सहा, सामान्य प्रशासन विभाग दि. २० सप्टेंबर, २००८.

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा देशभरात दि. १२/१०/२००५ पासून लागू करण्यात आला आहे. शासनाने वेळोवेळी जाणीवपूर्वक उचललेल्या पावलांमुळे अल्पावधीतच राज्यात हा कायदा लक्षणीय स्वरुपात लोकाभिमुख झाला आहे. महाराष्ट्रात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या व्यापक प्रसिध्दीकरिता व प्रभावी अंमलबजावणीकरिता शासन स्तरावरुन सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत आहेत. दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी माहितीचा अधिकार अधिनियम या कायद्यातील तरतुदी आणि कार्यपध्दती, विविध दृकश्राव्य माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देवून व विविध उपक्रम राबवून, त्या जास्तीत जास्त नागरिकांपर्यत पाहोचविण्याचा शासनाचा मानस आहे. यास्तव प्रतिवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस "माहिती अधिकार दिन" म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा, असा निर्णय शासनाने घेतला आहे. हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात यावा.

तरी संदर्भिय शासन निर्णयान्वये आपल्या विभागामार्फत २८ सप्टेंबर हा दिवस "**माहिती अधिकार दिन**" म्हणून मि.भा.मनपा संकेतस्थळावर व सोशल मिडीया तसेच इतर माध्यमाव्दारे सदर कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी दयावी व जनजागृती करावी. तसेच राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

सोबत- संदर्भिय शासन निर्णय.

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मु.)
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव :**
**१) मा. आयुक्त महोदय, मि.भा.मनपा**
**२) मा. अति.आयुक्त (१ व २) मि.भा.मनपा**